# समृद्धीच्या वाटचालीचे आदर्श गाव - खोमारपाडा

राज्याच्या मनरेगा विभागांतर्गत पालघर जिल्हातील विक्रमगड तालुक्यातील खोमारपाडा सध्या खूप चर्चेत आहे. मनरेगा विभागाने प्रत्येक कुटुंब लखपती (समृद्धी) चा ध्यास घेतला कारण की मनरेगांतर्गत 263 प्रकारची कामे म्हणजेच योजना अनुज्ञेय आहेत. त्यात बऱ्याच योजना वैयक्तिक स्वरुपाच्या आहेत. त्यातील काही योजना ग्रामीण भागाच्या कुटुंबांमध्ये लोकप्रिय आहेत. या वैयक्तिक योजनांचे योग्य पध्दतीने विचारपूर्वक जुळवा-जुळव केल्यास राज्यातील प्रत्येक कुटुंब लखपती होणे शक्य आहे. राज्यात सध्या 14.9 टक्के कुटुंबे दारिद्रय रेखेखाली आहेत. त्या सर्वांना लखपती करावयाचे झाल्यास मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता भासणार आहे. त्याचे उत्तरही मनरेगात उपलब्ध आहे. त्यातील कामे अकुशल कुशलचे प्रमाण 60:40 मध्ये राखून आणि प्रत्येक जॉबकार्डधारकाला वर्षात 100 दिवसांच्या मर्यादित रोजगार दिल्यास भारत सरकार 90 टक्के राशी लावते तर राज्य सरकारला फक्त 10 टक्के राशी लावावी लागते. अशा पध्दतीने केंद्र सरकारच्या मदतीने राज्यातील सर्व कुटुंबांना लखपती करणे शक्य आहे.



या संकल्पनेच्या आधारे राज्यात प्रत्येक तालुक्यातील एका गावाचा 10 वार्षिक नियोजन करण्यात आले आहे.  असे करतांना मनरेगांतर्गत कार्य करणाऱ्या राज्यातील प्रत्येक तालुक्यातील संपूर्ण तालुकास्तरीय यंत्रणेला 10 वार्षिक नियोजनाचे प्रशिक्षण देणे हा दुहेरी उद्देश्य सुद्धा साध्य करण्यात आला आहे.  वर्ष 2023-24 चा लेबर बजेट (समृद्धी बजेट) करतांना राज्यातील 100 टक्के गावांचे नियोजन 10 वर्षांचे विचार करून केले जाणार आहे. या नियोजनाचे ज्ञान आणि कौशल्य असणारे राज्यात साधारण 100 लोक मनरेगांतर्गत तयार करण्यात आले आहेत.  राज्याचे 100 टक्के गावांचे दसवार्षिक नियोजन करताना राज्यातील 100 टक्के ग्रामरोजगार सेवक, ग्रामसेवक, सरपंच तसेच गाव स्तरावरील सर्व यंत्रणेला याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण होणार आहे.

वरील प्रकारे राज्यांतील 100 टक्के गावांचे नियोजन केले जाणार हे स्वतः मध्ये एक यश आहे. परंतु त्याची अंमलबजावणी कशी होणार किंवा ते शक्य आहे काय असे प्रश्न डोक्यात येणे सहज आहे. कारण की या आधी एवढ्या मोठ्या प्रमाणावर विकास अशा द्रुतगतीने कोणाच्याच पाहण्यात नाही. असे विचार डोक्यात येत असतांना खोमारपाडयात मागील आठ वर्षामध्ये केलेल्या प्रगतीचा अभ्यास करणे अगत्याचे वाटायला लागते. मनरेगाच्या अंमलबजावणीतून राज्याच्या प्रत्येक कुटुंबाला लखपती करता येते हे विचार बिंबवण्याकरीता मनरेगांतर्गत कार्यरत यंत्रणेला सधन प्रशिक्षण देण्याचा विचार येताक्षणी मनरेगा विभाग त्या लोकांना खोमारपाडा दाखविण्याचा निर्धार करून त्यांचा खोमारपाडा अभ्यास दौरा किंवा प्रशिक्षण आयोजित करतो. अशाप्रकारे सध्या खोमारपाडा विकासाचा आणि समृद्धीचा तीर्थस्थळ बनला आहे. त्यामुळे गावाच्या विकासाचे टप्पे, गती आणि अडथळयांवर अधिक अभ्यास आवश्यक आहे. त्याची सुरुवात म्हणून हे नोट्स लिहिण्याचा हा खटाटोप.





- **सन 2013 मधील खोमारपाडा**

सोयी-सुविधेची कमतरता असलेले बहुतांश वारली समाजातले साधारण 900 लोकसंख्येचे हे गाव. गावात परंपरागत भातशेतीने मिळणाऱ्या उत्पन्नातून वर्षभराची गरज भागवणे शक्य नसलेले लोक दरवर्षी 6 महीने स्थालांतरीत व्हायचे. काही लोक किनारपट्टीत प्रचलित समुद्रात मासेमारीत रोजगार मिळवायचे तर अन्यलोक शहरी भागातील उद्योगधंदयांमध्ये त्यांना मिळेल तसे अंगमेहनतीचे काम करायचे. मासेमारी करत असतांना काहीवेळा बोट बुडून जायचे. त्या बोटमधील मच्छीमारांच्या शरीराचा थांगपत्ता सुध्दा नाही लागायचा. अन्य व्यवसायात कार्य करणाऱ्या लोकांना रोज 500 रुपये मिळायचे. परंतु असे रोजगार शाश्वत नव्हते. काही काही वेळा आठ-आठ दिवस कोणतेच काम भेटायचे नाही. स्थलांतराच्या ठिकाणी सुध्दा आलबेल नसावयाचे. त्यामुळे शेतीचा हंगाम सुरू झाला की सर्वचजण गावात परत यावयाचे आणि पारंपरिक भातशेती करावयाचे. स्थलांतराच्या ठिकाणच्या कामातून परत येतांना 20 ते 25 हजार बचत करून आलेल्या राशीतून संसार चालवायचे. गरज पडल्यावर एजेंट लोकांकडून कर्ज घ्यावयाचे आणि पुढच्या वर्षी पुन्हा स्थलांतराचे कराराचे बंधन स्वतावर लादून घ्यायचे. अशाप्रकारे दुष्टचक्रात गावातील कुटुंबांचे आयुष्य फसलेले होते.

- **शेतीतून उत्पन्न वाढण्यावर भर**

विक्रमगड तालुक्यावर निसर्गाची कृपा आहे.  येथे दरवर्षी 2500 मिमी पाऊस पडतो. खोमारपाडा गावातील लोक भातशेती करत होते.  भातशेतीतून सर्व साधारणपणे एकरी रु. 10,000 प्रति वर्षात लाभ दिसत होता.  मात्र लागणाऱ्या मनुष्यबळाचा योग्य हिशोब लावल्यास त्याच्यातून तोटा होतांना दिसत होता. मोरे गुरुजी बीड जिल्हातून येथे आले होते. त्यांच्याकडे भातशेती शिवाय अन्य पिके घेतली जात होती.  त्यांनी विविध पिकांचेपासून एकरी मिळणाऱ्या उत्पन्नांची गणना करण्यास सुरुवात केली.  लोकांकडे जमीनीची उपलब्धता सुध्दा जेमतेम. त्यातली बरीचशी जमीन देवस्थानाची आणि बाहेरगावी राहणाऱ्या वाणी समाजाची आहे. येथील आदिवासी समाज त्या जमीनीवर कुळ म्हणून कसतात. त्याशिवाय वन विभागाच्या जमीनीवर सुध्दा काही लोकांची शेती आहे. परंपरागत पध्दतीच्या भातशेतीला एवढे वर्षे लोटून गेले होते की या गावात भाताशिवाय दूसरे पिक येऊच शकत नाहीत असा लोकांचा विश्वास घट्ट झाला होता. त्यांना असेही वाटे की इतर कोणते पिक घेतल्यास बांधांवरच्या झाडातून कीडे उतरुन त्यास नष्ट करतील. त्या कीडांचा प्रादुर्भाव फक्त भातशेतीला होत नसते.



तेव्हा मोरे गुरुजीने भातशेतीतूनच अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी बाजारात अधिक किंमत मिळणाऱ्या तांदुळांचा अभ्यास केला.  तसेच भातशेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी अजून काय करता येते यावर युट्यूबचे भरपूर व्हिडिओ पाहिले. मोरे गुरुजींना स्वतः शेती बद्दल फार माहिती नव्हती.  पालकांचे स्थलांतर थांबवण्यासाठी शेतीतून त्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या उद्देशाने त्यांनी शेती अभ्यासायला सुरुवात केली. अध्ययनाचा स्रोत फक्त युट्यूब व्हिडिओ होता.  भाताची वेगळी व्हरायटी बदलून आणि उत्पादकता वाढवून लोकांचे उत्पन्न वाढवण्याची चर्चा सुरु झाली. सुरवातीस 2-3 कुटुंबांनी मोरे गुरुजींचे ऐकले.  त्यांचे उत्पन्न वाढलेले पाहून पुढील वर्षी अधिक कुटुंबे त्यांचे ऐकून शेतीत बदल केला. बाबु मोरेनी कुटुंबांचेच स्थलांतर थांबविण्याचे ठरवले. कुटुंबच गावाबाहेर जाणार नाहीत तर मुले सुद्धा गावातच राहतील, आणि शाळेत सुध्दा नियमित राहतील. 100 टक्के मुले नियमित राहिल्यास शासनाचे 100 टक्के मुले शिकण्याचा हट्ट पुरवता येणे शक्य होईल. या विचाराने गुरुजीने शाळकरी मुलांच्या पालकांचे उत्पन्न वाढवण्याचे ठरविले.

गुरुजींनी शाळेत परसबाग लावली. त्यात टमाटे, कोथिंबीर, वांगे व काही वेलवर्गीय पिके, कांदे इत्यादी लावली. शाळेच्या मध्यान्ह भोजनात या फळ व पालेभाज्यांचा उपयोग करायला लागले. परसबागेत एवढी भाजी पिकायला लागली की काही भाज्या गावातील लोकांना मोरे गुरुजी खायला द्यायला लागले. सोबत हे ही बोलणं सुरु झाले की, शाळेतही पिके येऊ शकतात तर गावात सुध्दा येऊ शकतात. त्याचे उदाहरण या फळ व पालेभाज्या म्हणून होत्या. लोकांमध्ये इतर पिकांबद्दल हळूहळू विश्वास वाढायला लागला. तेव्हा गुरुजींनी विविध पिकांपासून एकरी किती पैसे कमवता येते याची गणना केली. (पाहा परिशिष्ट 1) वेगवेगळ्या शेतकऱ्यांसोबत त्यांच्या आवडीनुसार, जमीनीचे प्रकार व पाण्याची उपलब्धता आणि विविध पिकांपासून मिळणारे उत्पन्न या सर्व बाबींचे विचार करुन बोलण्यास सुरवात केली. योग्य प्रकारचे पिक घेतल्यास फार कमी जमीनीतून सुध्दा अधिक पैसा कमवता येतो हे लोकांना लक्षात यायला लागले. संपूर्ण गावाने पिक बदलाचा स्वीकार केला. स्वत: च्या शेतात विहीर नसल्यास भाड्याने सिंचनाचे पाणी विकत घेतले आणि कांद्यासारखे पिक पिकवले. शेतातून लोकांचे उत्पन्न वाढायला लागले आणि स्थलांतर थांबण्यास सुरुवात झाली.

### ❖ शेळीपालनाकडे लक्ष गेले





गावांत अधिकांश कुटुंबांकडे 2-4 शेळ्या तर 2-4 कोंबड्या होत्या. प्रत्येक जण आपआपली बकरी सांभाळायची, म्हणजेच चारण्यांसाठी 2-4 बकऱ्यांमागे एक व्यक्ती दिवसभर फिरायचे. ही आर्थिकदृष्ट्या परवडणारी बाब नव्हती. परंतु गावाचा इतिहास आणि परंपरा हीच होती. शेती आणि जोडधंदा म्हणून शेळी आणि कोंबडीपालन. त्यातील कशात तोटा होता आणि फायदा कशात याचा हिशेब कोणीच लावत नसे. गुरुजींने एक - एकासोबत बोलायला सुरुवात केली. दोन शेळ्यांमागे एका व्यक्तीचा पूर्ण वेळ दिल्याने कुटुंबांच्या उत्पन्नात फारशी भर पडत नाही. त्यामुळे कुटुंब चालवण्याकरीता स्थलांतर व्हावे लागते. त्यामुळे 4 बकऱ्यांऐवजी 40 किंवा त्याहून अधिक बकऱ्यांचे पालन प्रत्येक कुटुंबाने करायला हवे किंवा 10 कुटुंबांच्या बकऱ्या एकत्र चारण्यासाठी एक व्यक्ती लावायला हवी.



अशाप्रकारे चर्चा सुरु होती. काही लोक एक विचार पकडायचे तर अन्य लोक दुसरे विचार.  काही लोक कोणताच बदल स्वीकारावयाचे नाहीत.

- **मनरेगाचा परिचय**

  या गावात वरीलप्रमाणे कार्य सुरू होते. जून 2020 मध्ये शासनाने श्री. नंदकुमार यांना मनरेगाचा पदभार दिला. या योजनेचा अभ्यास करता-करता 263 योजनांचे उपयोग करुन राज्यातील प्रत्येक कुटुंबाला समृध्द (लखपती) करता येते या विचारापर्यंत श्री. नंदकुमार पोहोचले. प्रत्येक कुटुंब लखपती होऊ शकत असतील तर विशेषरित्या अडचणीत असलेले मानवसमूहांना सुद्धा लखपती करता येणे शक्य असायला हवे. असा एक मानवसमुह PVTG म्हणून ओळखले जाणारे आणि मुंबई पासून फार लांब नसणारे PVTG हे कातकरी होते. या काळात कोव्हिड-19 चे वेग-वेगळ्या प्रकारचे लॉकडाऊनचे बंधन पाळून फक्त स्वतःच्या गाडीत प्रवास करणे शक्य होते. म्हणून मुंबईजवळचे ठिकाण निवडण्यात आले. कातकरी समाजाला केंद्रस्थानी ठेवून वर्ष 2020 आणि 2021 मध्ये मनरेगा सचिवांनी पालघर जिल्हाचे 6 ते 7 दौरे केले. "प्रत्येक कुटुंब लखपती" या विचारामध्ये गुरुजींना स्थलांतर थांबवण्यासाठी उत्पन्न वाढण्याच्या विचारांची पुढची पायरी दिसायला लागली. मोरे गुरुजींसोबत अधे-मधे फोनवर चर्चा सुरू झाली.  ते स्वतः गावातील वेग-वेगळ्या कुटुंबांचे विचार करुन त्यात मनरेगाची जोड देऊन त्यांना कसे लखपती करती येईल यावर विचार करायला लागले. अशाप्रकारें जमीनी पातळीवर परिणाम मिळवण्याकरिता धोरण पातळीवर बदलांच्या गरजांचा थेट संबंध जुळला. मनरेगामध्ये लोकांना शेळीपालन शेड देता येते. त्यामुळे २-4 बकऱ्या सांभाळणाऱ्या लोकांना आता 40 बकऱ्या सांभाळणे शक्य होणार होते. शेळयांना ठेवण्याकरिता पुरेशी जागा नसेल तर पावसाळ्यात शेळ्यांना आजारापासून वाचवण्याकरीता कोठे ठेवावे? या प्रश्नाचे उत्तर लोकांकडे नव्हते, म्हणून बहुतेक ते 2-4 शेळ्यांचे पुढे जात नसावेत.  परंतु आता त्यांना शासनाकडून गोठा बांधून मिळत आहे. गोठ्याबाबतीत शासनाने एक क्रांतीकारी निर्णय घेत मा. शरदचंद्र पवार ग्राम समृद्धी योजनेंतर्गत शेळीपालनास चालना देण्यासाठी योजनेत बदल करण्यात आले असून ग्राम समृध्दी आणण्याच्या हेतूने केले



गेले असल्यामुळे दुग्धव्यवसाय असो की शेळीपालन की कुक्कुटपालन कोणत्याही एका व्यवसायतून किंवा या सर्व व्यवसायांच्या संयोजनातून लाभार्थी लखपती व्हायला पाहिजे याची काळजी घेतली गेली होती. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाला अनुज्ञेय असणाऱ्या गोठयांमध्ये 1 युनिटची मर्यादा न घालता 3 युनिटपर्यंत परवानगी देण्यात आली.

❖ **युवावर्गाचे आकर्षण**

आजचा युवा वर्ग शिक्षित आहे. त्यांच्याकडे मोबाईल आणि मोटरसायकल आहेत. शेतात काम करणे आवडत नाही. ते जवळच्या शहरांमध्ये उद्योगधंदयांसाठी कामाला जातात. तेथे रु 10,000 ते 15,000 महिन्याला मिळवतात. काही युवकांना मासिक पगारवाली नोकरी मिळालेली नाही. असे युवक दिवसाच्या मजूरीवर काम करतात. काही युवक बेरोजगार सुद्धा आहेत. मात्र त्यांच्या मोबाईलचा डेटापॅक आणि मोटारसायकलचा पेट्रोल आणि आनुषंगिक बाबी या गरजा भागवण्यासाठी पैशांची गरज नेहमीच असते. काही युवकांना रु.50 चे डेटापॅक भरतांना पाहिले गेले आहे. खरी त्यांची इच्छा रु.400 चा डेटापॅकची असते. त्यांना ते करता यावे हे आपल्या राज्याचे उद्दिष्ट आहे. तसेच मोटारसायकलवर महिन्याला रु. 5,000 ते 6,000 खर्च असतो. तेही त्यांना करता येईल एवढे उत्पन्न राज्यातील प्रत्येक युवकाचे असावे असे राज्य शासनाला वाटते.

खोमारपाडयाचे युवक यापेक्षा वेगळे नाहीत. आदिवासी गाव आहे. प्रत्येक घरात 2-4 कोंबड्या असतातच. मनरेगांतर्गत 300 कोंबड्यासाठी शेड अनुज्ञेय आहे. अशा युवकांनी कोंबडीपालन केल्यास त्यांना शेतातपण जावे लागणार नाही आणि उत्पन्न सुद्धा मिळवता येईल. मोरे गुरुजींनी युवकांना यासाठी प्रवृत्त केले आहे. गावरान कोंबडी पालनाशिवाय ब्रायलरचा धंदासुद्धा करता येतो. त्या भागात पोल्ट्रीचे काही व्यवसाय आहेत जे ब्रायलरचे पिल्लू देऊन 40 दिवस सांभाळण्याकरीता छोटे कुक्कुटपालन शेडवाले लोकांना देतात. या कालावधीनंतर ते परत घेतात. मधल्या काळात लसीकरण, औषध, फीड सुद्धा तेच देतात. शेवटी परत घेतांना प्रत्येक ब्रायलरमागे ठराविक रक्कम देतात. धोके (Risk) पत्करण्याचे कमी भूक असलेले युवक अशा पद्धतीने कुक्कुटपालनाचे व्यवसाय करु शकतात.

खोमारपाड्यात अनिल ओझरे या युवकाने कुक्कुटपालन फीड तयार करण्याचे मशीन घेतले आहे. त्यासाठी त्यांनीच विचार केला, बँक कर्जाचा प्रस्ताव तयार केला, प्रस्ताव मंजूर करून घेतला आणि आता त्या मशीनचे ते मालक आहेत. हे मशीन एका दळण यंत्रासारखे आहे. त्यातून पदार्थ दळल्यानंतर विविध





आकाराचे तुकडे चाळणी लावून विलग करता येतात. त्यामुळे हे मशीन पोल्ट्रीफीड, मत्स्यफीड अशा वेगवेगळ्या बाबींसाठी उपयोगाचे आहे. अशा पद्धतीने गावातील युवक आपल्या वैयक्तिक विकासासह गावात नवीन धंधा व्यवसायाचे विचार पेरत आहेत. हा युवक आधी शहरात नोकरी करत होता. लॉकडाऊनच्या काळात त्याची नोकरी गेली. त्याला गावात यावे लागले. आता तो एक व्यावसायिक होण्याच्या मार्गावर आहे.

❖ **शेततळ्याचे आगमन**

गावातील दत्तू ठाकरे आधी समुद्रात जाऊन इतरांसाठी मासेमारीचे कार्य करावयाचा. एकदा मासेमारीत त्यांची बोट बुडाली. एक दोन महीने दत्तू ठाकरे कुठेच दिसले नाहीत. लोकांना वाटले की गावातील काही मच्छीमारांचे प्रेत सापडत नाहीत. तसेच त्याच्याबाबतीत घडले असावे. दत्तूची आई दु:खी होती. मात्र काही महिन्यांनी दत्तू परत आला. तो त्या काळात नेव्हीचे एका बचाव केन्द्रावर राहिला होता. आता दत्तू गावातील एक प्रगत शेतकरी आहे. त्याच्यांकडे कृषी विभागाने दिलेली विहीर आहे. महाराष्ट्राचा 83 टक्के भागासारखेच खोमारपाड्यात सुध्दा साधारण 15 फुटाखाली काळा खडक आहे. त्याच्यापुढे विहीर खोदता येत नाही आणि या खडकाखाली पाणीही नसते. मोरे गुरुजींचा सल्ला ऐकूण दत्तूने कलिंगड लावावयाचे ठरवले होते. त्याच्यातून चांगला नफासुद्धा मिळाला. मात्र शेवट-शेवटला उन्हाळयात पाणी कमी पडले. विहीरीची खोली थोडी वाढवली. परंतु तरीही पाणी अपुरेच राहिले. तेव्हा विहीरीच्या बाजूलाच शेततळे करण्याचा विचार आला. अशा पद्धतीने गावात पहिल्या शेततळ्याचे पदार्पण झाले. सध्या गावात 3 शेततळे आहेत. त्यातले दोन अस्तरीकरणासह पूर्ण आले आहेत, तर एकास अस्तीकरण लावणे शिल्लक आहे.

या भागाच्या मातीच्या प्रकारात अस्तरीकरणाशिवाय पाणी 3 महिन्यांपेक्षा अधिक थांबत नाही. याचा अभ्यास करुन शासनाने दि. 6 एप्रिल, 2021 शासन निर्णय अन्वये मनरेगांतर्गत अस्तरीकरणसह शेततळयास परवानगी दिली आहे. त्यामुळे आदिवासी आणि दारिद्रय रेषेखालील कुटुंबांनासुध्दा आता शेततळे घेणे शक्य झाले आहे. दत्तू आणि विनोद गहला यांचे शेततळे पूर्ण झाले आहेत. या भागात पाऊस खूप पडतो. यावर्षी दोघांचे शेततळे पावसानेच भरुन गेले. एवढे जास्त भरले की सायफन पध्दतीने त्यातले काही पाणी काढावे लागले. या दोन्ही शेतकऱ्यांनी यावर्षी शेततळ्यात मासोळेसुध्दा टाकले आहेत. दत्तूने रोहू आणि कतला टाकले आहेत तर विनोद गहलाने रोहू, कतला आणि फंगस टाकले आहेत. मत्स्य पालनानंतर अधिक पोषक झालेल्या पाण्याचा वापर शेतातसुध्दा करणार आहेत.

या दोघांना होणारा लाभ पाहून आतापर्यंत 25 अन्य शेतकऱ्यांनी शेततळे घेण्यासाठी अर्ज केला आहे. सर्वांना शेततळे दिल्यास आता दोन प्रकारच्या अडचणी या गावाला जाणवायला लागल्या आहेत. एक, एवढ्या मोठ्या संख्येने मजूर उपलब्ध करुन घेणे. पण सुरुवातीस आजूबाजूच्या गावांमध्ये मनरेगाबद्दल अशा



प्रकारची जाण आणि चळवळ सध्या नाही. त्यामुळे 5 किमी अंतरापर्यंत गावातील मजूर उपलब्ध होतील. गावातील 18 वर्षांपेक्षा अधिक वय झालेल्या सर्व युवकांना जॉबकार्ड देण्याची योजनासुध्दा गावाने आखले आहे. दूसरी अडचण आहे ती अस्तरीकरणाचे वाढलेले दर. त्यामुळे शेततळ्याचे अडीच लाखाच्या खर्चापैकी दीड लाख अकुशल आणि एक लाख अस्तरीकरण. यात चांगल्या गुणवत्तेचे अस्तरीकरण विकत घेता येत नाही. यासाठी गावपातळीवरच अधिक अकुशल देणारे कार्य करता आल्यास त्या कामांमधून तयार होणारे कुशलचे वापर संयोजनातून अस्तरीकरण खरेदी करण्यासाठी वापरता येईल. मात्र वरील सर्व अडचणी सोडवून गावात शेततळ्याच्या माध्यमातून प्रत्येक शेताला पाणी देता येते हे नक्की.

- **स्वयंसेवी संस्था**

खोमारपाड्यात सध्या 3 संस्था कार्यरत आहेत. इस्कॉन, अक्षरधारा फाउंडेशन आणि सुहृदय फाउंडेशन. मोरे गुरुजींने या तीन्ही संस्थांचे उपयोग गावाच्या कार्यासाठी करुन घेतले आहे. अक्षरधारा फाउंडेशन शाळेला लागणाऱ्या साहित्य जसे स्टेशनरी, बाके, घड्याळ अजून काही अत्यावश्यक साहित्यांसाठी मदत करते. सुहृदय फाउंडेशनने मुलांचे आणि लोकांच्या आरोग्याकडे लक्ष पुरविले आहे. मुलांचे सातत्यपूर्ण आरोग्य तपासणी, गरजेनुसार औषधोपचार आणि वेळ पडल्यास मुंबईतील दवाखान्यात घेऊन जाऊन उपचार. इस्कॉन फाऊंडेशनने शेतीच्या माध्यमातून लोकांचे राहणीमान सुधारण्याचे कार्य सुरु केले आहे. त्यासाठी इस्कॉनने बायफ या संस्थेद्वारे डिझाईन केले गेलेल्या "वाडी प्रकल्पाचा" आधार घेतला आहे. वाडी प्रकल्प काय आहे? तर त्यात अगदी दरिद्र कुटुंबाला ज्याला रोज जेवणाचीसुध्दा काळजी घ्यावी लागते त्या पातळीवरुन शेतीच्या माध्यमातूनच श्रीमंतीने कसे जगता येईल या पातळीवर घेऊन जाण्याचा विचार केला गेला आहे. त्यात तात्काळ (Short), मध्यम (Medium) आणि दीर्घकाळ (Long Term) या तीन्हीचा विचार केला गेला आहे. म्हणजेच त्यात 15 दिवस ते 120 दिवसांत येणारे पिकं (पालेभाज्या,

फळभाज्या, वेलवर्गीय पिके, भात इ.), 1 ते 3 वर्षांत येणारी पिके (फुलशेती, फळबागे जसे डाळिंब, सीताफळ, पेरु इ.) आणि 3 वर्षांपेक्षा अधिक कालावधीत येणारी पिके पण दीर्घ काळापर्यंत उत्पन्न देणारी पिके (आंबा, काजू, चिकू इ.) याचा समावेश आहेत. अशा सर्व प्रकारची पिके प्रत्येक शेतकऱ्याच्या जमिनीच्या काही काही भागात लावले जातात. या पध्दतीने ते कुटुंब दैनिक गरजा भागवण्यासह कालांतराने समृध्द (लखपती) होऊन जगतील असा विचार आहे. "वाडी प्रकल्पात" शेळीपालन आणि कुक्कुट पालनासारखे इतर धंद्यांचे सुध्दा जोड देता येते.

अशा प्रकारे ¨वाडी प्रकल्पाचे" कार्य करत असतांना निवडलेल्या कुटुंबाला किमान 5 वर्षांपर्यंत सतत काहीतरी मदत करावी लागते. त्यातले अधिकांश मदत फळबाग आणि फूलशेतीचे असतात. इस्कॉन फाऊंडेशन आपले कार्य CSR च्या मदतीने करते. CSR चा राशि वर्षानुवर्षे सारखेच राहील. याची शाश्वती नसते. फळबाग आणि फूलशेती दोन्ही कार्ये मनरेगा मध्ये अनुज्ञेय आहेत. त्यामुळे खोमारपाड्यात मनरेगाच्या प्रभावी कार्याने इस्कॉन फाऊंडेशनला आपले कार्य करणे सोपे झाले आहे. संपूर्ण राज्यात असे हजारो फाऊंडेशन कार्यरत आहेत. फेब्रुवारी 2021 चा बिनखर्चिक स्वयंसेवी संस्थाचे सहभाग या शासन निर्णयाचा सर्व गविअ, मुकाअ व जिल्हाधिकारी तथा कार्यक्रम समन्वयकांनी अशाच प्रकारे उपयोग करणे अपेक्षित आहे. स्वयंसेवी संस्था आणि शासन या दोघांनी परस्परावलंबी पध्दतीने कार्य करणे अपेक्षित आहे. वाडी प्रकल्पात अपेक्षिलेल्याप्रमाणे गावातील लोक आता दिर्घकाळ टिकून राहणारे उत्पन्नाच्या साधनांकडे (Income Source) जायला लागले आहेत. यावर्षी मनरेगा मधून 4.5 एकर जमिनीवर 18,000 रोपे मोगऱ्याचे तर 10 एकर जमिनीवर 1,000 रोपे आंब्यांचे लावले जाणार आहेत. सोबतच इस्कॉनच्या मदतीने 1.5 एकर क्षेत्रामध्ये 6,200 मोगऱ्याचे रोपे लावले जाणार आहेत.

❖ **एकमेकांस सहाय्य**

गावातील रामा चौधरीकडे 8-10 गुंठे जमीन आहे. त्यात भात लागवड करुन वर्षाचा उत्पन्न कुटुंबाला पूरत नाही. त्यामुळे तो स्थलांतरीत होतो. मोरे गुरुजींने त्याची भेट जीवन टोकरेशी घालून दिली, ज्याच्याकडे 5 एकर जमीन आहे. जीवन टोकरेकडे शेती करायला माणसे कमी आहेत म्हणून ते कष्टाळू रामा चौधरीला काही जमीन कसण्यासाठी देण्यास तयार झाले. दोघांनी मिळून त्यात कांदा आणि गवार घ्यावयाचे ठरवले. पण दोघांच्या शेतात पाण्याची काही व्यवस्था नव्हती. म्हणून मोरे गुरुजीने या दोघांची भेट मोहन पागेशी करुन दिली. त्याच्या शेतात विहीर आहे. त्यांना खायला कांदे आणि रु.1000 देऊ केले आणि ते पाणी देण्यास तयार झाले. एकाची जमीन दूसऱ्याचे पाणी तर तिसऱ्याचे मेहनत अशा प्रकारे तिघांनी आपले उत्पन्न वाढवून घेतले. आतापर्यंत गावात असे 8 ते 10 उदाहरणे आहेत.



घाऊक खरेदीतून पैशांची बचत : गावात मोगऱ्याचे 18000 रोपे लागणार आहेत. बाजारात रु.10 ते रु.12 प्रत्येक रोपाची किंमत आहे. वाडामध्ये ग्लोबल इंडियन फाऊंडेशन कार्यरत आहे. मोरे गुरुजींनी त्यांच्याशी संपर्क साधून रु.5 ला एक रोप मिळवून देण्याची व्यवस्था केली आहे. याने गावकऱ्यांचे साधारण रु.90,000 ची बचत होणार आहे. याचप्रकारे गावात मोठ्या प्रमाणावर गाय गोठे, कुक्कुटपालन शेड, शेळीपालन शेड, नाडेप आणि व्हर्मी कंपोस्टचे पीट बांधले जात आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर सिमेंट, वीट, लोखंड, लोखंडी पाईप लागतात. सिमेंटचा पुरवठा थेट कंपनीकडून करण्यात येऊन पैशाची बचत केली जात आहे. तर वीटांची निर्मिती गावातीलच एका व्यक्तीने केली. बाहेर वीटांचे दर रु.6 ते 7 आहे. त्यात वाहतूकीचा खर्च वेगळा. गावातच वीट निर्मीती होऊन रु.5 ला वीट मिळाल्याने गावातीलच एका व्यक्तीला नफा मिळाला आणि अन्य लोकांना स्वस्तात वीट. पाईपसुध्दा घाऊक दराने घेतले गेले. गावातून मोठ्या प्रमाणावर मोगरा निघेल तेव्हा सर्व शेतकऱ्यांचा मोगरा दादरच्या बाजारात एकत्रितरित्या एकच गाडीने भरुन विकण्यास जाणार आहे. मेहनत-मशागत आपआपली तर ने-आण किंवा खरेदी-विक्री एकत्रित असे या गावाने आपले मॉडेल ठरवले आहे. नवीन तंत्र शिकण्यासाठीसुध्दा एकमेकांची मदत घेतात. शिकण्याचा मुख्य स्त्रोत मोबाईल फोनचा व्हिडिओ आहे.

### ❖ तेलबिया उत्पादन

परंपरागत फक्त खरीपात भातशेती करणाऱ्या गावाला हळूहळू रब्बी पीके पण घेण्याची सवय लावली जात आहे. गावच्या भूगर्भात काळा पाषाण असल्यामुळे विहीरी जास्त खोलपर्यंत जाऊ शकत नाहीत. शेततळ्याच्या मदतीनेच रब्बी घ्यावे लागणार. त्यामुळे कमी पाणी लागणाऱ्या पिकांचे शोध मोरे गुरुजी घेत आहेत. आमच्याकडूनच मिळालेल्या माहिती की देशाने वर्ष 2020-21 मध्ये रु.65,000 कोटीचे गोडतेलाचा आयात केला आहे. मोरे गुरुजी शेतकऱ्यांना तेलबिया उत्पादनाकडे वळवत आहेत. देशाला तेलाची गरज असल्यामुळे तेलबियाचे भाव लगेच कोसळणार नाही. तेलबिया नाशवंत नाहीत. तसेच, तेलबियांना पाणीसुध्दा कमी लागते. या भागात सुर्यफूल आणि सोयाबीन खूप चांगले येते. यानेसुध्दा शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यास मदत होईल.

### ❖ उपलब्ध ज्ञान आणि कौशल्याला बेस धरुन प्रगती :

गावातील लोकांकडे शेत (भातशेती), कोंबडापालन, शेळीपालन, याचे ज्ञान आणि कौशल्य आहे. त्याचाच उपयोग इतर पिकांची शेती, व्यावसायिक स्तरावर शेळी आणि कुक्कुटपालनासाठी करण्याचे मोरे गुरुजींनी ठरवले. उपलब्ध ज्ञान आणि कौशल्यामध्ये युट्युबचा व्हिडिओ पाहून गटचर्चेतून गावातील युवक आपले ज्ञान वाढवतात. अशाप्रकारे प्राप्त ज्ञानाचा प्रत्यक्ष शेतीत, शेळीपालन व कुक्कुटपालनामध्ये उपयोग करुन आपले कौशल्य वाढवतात. त्यात बी.एस.सी. झालेले अनिल ओझरे आणि गणितात बी.एस.सी. झालेले ठाकरे या दोन युवकांचा समावेश आहेत.

शेतीतील धोक्यांची यांना जाण आहे. म्हणून मोरे गुरुजींच्या मार्गदर्शनात प्रयोग करत असतांना सुरुवातीस छोट्या भागात नवीन पिकांची शेती करतात. जेणेकरुन काही चूक झाल्यास किंवा नवीन आजारांचा प्रादुर्भाव झाल्यास वर्षाचे पूर्ण अर्थकारण कोलमडणार नाही. दोन-तीन वर्षे चांगले लाभ मिळायला लागले आणि आपले नव्याने अंगीकारलेले ज्ञान आणि कौशल्यावर विश्वास बसले की त्या पिकांकडे मोठ्या प्रमाणावर वाटचाल करतात.

त्याचप्रमाणे शेतीपूरक व्यवसायाकडेसुध्दा मोरे गुरुजी आणि या गावाचे लोक बघतात. शेतीपूरक व्यवसाय म्हणजे शेतीतून मिळणाऱ्या चारा, पाला, पाचोळा इत्यादींच्या उपयोगातून अधिक उत्पन्न मिळवणे. चाऱ्याचा उपयोग गाय, शेळी इ. पालनासाठी करता येते. पालापाचोळयाचा उपयोग नाडेपमध्ये कुजवून खत तयार करण्यासाठी करता येते. गाय-शेळीच्या गोबर आणि लेंढीतून व्हर्मी कंपोस्ट तयार करता येते. अशाप्रकारे तयार व्हर्मी आणि नाडेप कंपोस्ट मधून प्राप्त खताचा उपयोग शेतीतील मातीचा सेंद्रीय कर्ब वाढवून त्याची पोत राखून त्यात घेतल्या जाणाऱ्या पिकांची उत्पादकता वाढवून उत्पन्न वाढवता येते. अशा प्रकारे शेती पूरक व्यवसाय म्हणजे शेतातून प्राप्त होणारे पिकांचे दाणेपासून त्याच्या पौधाचे प्रत्येक भागाचा उपयोग उत्पन्नवाढीसाठी करणे. तसेच जनावर पालनाने मिळणारे दूध व मांस यांसह मल आणि मुत्राचा ही उपयोग करुन उत्पन्नात वाढ करणे. या गावात आतापर्यंत 45 व्हर्मी आणि नाडेप खड्डे बांधण्यात आले आहेत. पुढील सहा महिन्यात गावातील सर्व 125 घरांमध्ये नाडेप आणि व्हर्मी खड्डे बांधले जातील.

❖ **मोकाट गुरे :**

या भागात लोक गायीचे दूध पीत नाहीत. त्यांच्या मते ते दूध वासरासाठी आहे. गोबरचाही उपयोग आर्थिकदृष्ट्या लाभदायी पद्धतीने करण्यात आला नाही. त्यामुळे गुरांचा सांभाळ हे आर्थिकदृष्ट्या न परवडणारी बाब आहे. दिवाळीनंतर गरीब कुटुंबे स्थलांतरीत होतात. तेव्हा गुरे मोकळे सोडून दिले जातात. गावात रब्बी पिके घेतले जात नव्हते तोपर्यंत मोकाट जनावरे ही काही मोठी समस्या नव्हती. आता गावातील साधारण 95 टक्के लोकांचे स्थलांतर थांबले आहेत. लोकांनी शेतीतून आपले उत्पन्न वाढविण्यासाठी आपल्या गुरांना बंदिस्त ठेवण्याचे ठरवले आहेत. मात्र 4-5 स्थलांतरीत होणारे कुटुंबाकडे गुरांना बंदिस्त ठेवण्यासाठी गोठा नाही आणि सांभाळण्यासाठी मनुष्यबळ ही उपलब्ध नाही. अशा कुटुंबांचे गुरांसाठी काय करावे यावर गावात चर्चा करण्यात आली आहे. मोरे गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली सामुदायिक गोठे मनरेगामधून बांधावयाचे ठरले आहे. सोबतच नाडेप आणि व्हर्मी कंपोस्ट खड्डेसुध्दा बांधले जातील. तयार झालेले खत विकून काही उत्पन्न मिळवले जाईल. गुरे मालकांकडून चारा आणि प्रत्येक गुरामागे रु.500 घेतले आहे.

❖ **बहुस्तरीय शेती (Multilayer Farming)**

आपल्या राज्यात सरासरी जमीन उपलब्धता 4 एकर प्रति कुटुंब आहे. पावसाचा प्रमाणसुध्दा राज्यातील बऱ्याचशा भागात मुबलक नाही. राज्यातील साधारण 235 लक्ष हेक्टर शेतीच्या फक्त 32 टक्के क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकते असे तज्ञांचे मत आहे. याचाच अर्थ राज्यात पाण्याचीसुध्दा कमतरता आहे. जमीन आणि पाणी या दोन्ही नैसर्गिक संसाधनाची कमतरता असेल तर जमीनीच्या प्रत्येक कणाचा एका वेळी एकापेक्षा अधिक पिकांसाठी उपयोगात आणणे आवश्यक ठरते. त्याचप्रमाणे पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा उपयोग एकापेक्षा अधिक पिकांच्या सिंचनासाठी केला गेला पाहिजे. बहुस्तरीय शेती (Multilayer Farming) नक्की हेच करते. राज्यातील प्रत्येक कुटुंब लखपती व्हावयाचे असेल तर प्रत्येकाला अशाच पध्दतीचे नैसर्गिक संसाधनाचे उपयोग करावा लागेल. राज्यातील सर्वसाधारण जनतेला सहजासहजी विश्वास बसत नाही की ते लखपती होऊ शकतात. त्यामुळे राज्यातील लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी प्रत्येकाने शेतकऱ्यांद्वारे यशस्वी प्रयोगाचे एकूण 8 व्हिडीओ पाहावेत म्हणून त्यांचे स्मार्ट PDF परिभ्रमित करण्यात आले होते. त्या 8 व्हिडिओमध्ये मध्यप्रदेश मधील एका बहुस्तरीय शेतीचे व्हिडिओ सुध्दा होते. मोरे गुरुजीने ते व्हिडिओ पाहिले होते. त्यामुळे खोमारपाडामध्येसुध्दा Multilayer farming चे काही प्रयोग करण्यात आले आहेत. त्यात जमिनीखाली आला तर सतहावर कोथिंबीर, मेथी, पालक, मुळा आणि त्यावर वेलवर्गीय पीकं असे घेण्यात आले आहेत. अलीकडे राज्यात विदर्भ भागातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर Multilayer farming करायला लागले आहेत.

❖ **मोरे गुरुजींचे स्वत: शिकणे :**





आधीच सांगितल्याप्रमाणे मोरे गुरुजीने 100 टक्के मुले शिकण्याच्या उद्देशाने त्यांचे स्थलांतर थांबविण्यासाठी विविध प्रयत्न करता-करता पालकांचे उत्पन्न वाढविणे हाच एकमेव उपाय आहे या निष्कर्षापर्यंत पोहोचले. रोहयो किंवा मनरेगामध्ये कार्यरत लोक स्थलांतर थांबविण्यासाठी उपाययोजना राबवत असतांना स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीवर भर देतात. मोरे गुरुजींनी स्थलांतर थांबविण्याच्या कार्यास सुरुवात केली तेव्हा रोहयो किंवा मनरेगाबाबत त्यांना फारशी माहिती नव्हती. तसेच, त्यावेळी मनरेगा यंत्रणेकडून सहकार्य मिळेल याबाबत खात्रीसुध्दा नव्हती. त्यामुळेच बहुतेक मोरे गुरुजी स्थानिक रोजगार निर्मितीपेक्षा उत्पन्नवाढीचा मार्ग निवडला असावा.

मोरे गुरुजींची मनरेगाची ओळख झाली तेव्हा समृध्द कुटुंबे आणि लखपती कुटुंबे करण्याच्या दृष्टीने मनरेगामार्फत मत्ता निर्मितीवर भर देण्याचे ठरविण्यात आले होते. त्यामुळे मनरेगाचा उद्दिष्ट आणि मोरे गुरुजींचे कार्य करण्याचे उद्दिष्ट सारखेच असल्याने बहुतेक मनरेगा आणि मोरे गुरुजी दोघांचे प्रयत्न

खोमारपाडा गावात जुळून आले. त्याचाच भाग म्हणून दि. 11 मार्च, 2021 रोजी श्री.नंदकुमार यांनी आदिवासी भागातील प्रत्येक कुटुंबांनी समृध्द, लखपती आणि कारपती होण्याचे स्वप्न पाहावेत यासाठी बैठक घेतली. या बैठकीत गावातील लोकांसह मनरेगा तसेच सरकारी यंत्रणेचे गावपातळीवरील कर्मचारी आणि अधिकारी हजर होते. या बैठकीत गावकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी जशी चर्चा होती तशी कर्मचारी आणि अधिकारी हे मनरेगाकडे फक्त रोजगार निर्मितीची योजना म्हणून न पाहता मत्ता निर्मितीतून दरिद्री संपवून समृध्दी निर्माण करण्याची योजना म्हणून पाहावी हे ही स्पष्ट होत होते.

या सभेत विक्रमगड तालुक्याचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री. बाळासाहेब गायकवाडसुध्दा हजर होते. या गावात तसेच, जिल्ह्यातील अन्य गावांच्या भेटीतून विश्वास तयार झाला की कातकरी समाजासह आदिवासी समाज मनरेगाच्या माध्यमातून विकसित होऊ शकतात. तेव्हा प्रशिक्षक तयार करण्याच्या हेतूने राज्यातील 40 विभागस्तरीय अधिकाऱ्यांची दोन दिवसीय कार्यशाळा पालघर येथे भरवण्यात आली. या कार्यशाळेत मोरे गुरुजी व बाळासाहेब गायकवाड दोघेही सहभागी होते. नंतर हे दोन्ही राज्यस्तरीय प्रशिक्षक म्हणून सहभागी होते. तेव्हा त्यांना पुन्हा प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षक म्हणून कार्य करीत असतांना स्वत:चे विचार अधिक स्पष्ट होत गेले. प्रशिक्षणार्थींनी प्रश्न विचारल्यावर स्पष्टता वृध्दिंगत होत गेली. या प्रक्रियेत मोरे गुरुजी आणि बाळासाहेब गायकवाड यांची चांगली टीम तयार झाली. गावाच्या कामाला वेग आला. सोबतच विक्रमगड तालुक्यातील इतर गावांतसुध्दा बाळासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली कामाला गती आली.





तोपर्यंत राज्यात 100 टक्के कुटुंब समृध्द (लखपती) करण्याच्या उद्देशाने दशवार्षिक नियोजन करणे सुरु झाले होते. प्रत्येक तालुक्यात एक गाव केले गेले. खोमारपाडा आधीच त्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे लक्षात आल्याने राज्यस्तरीय मानव संसाधन समन्वयकांना दोन उद्ददेशाने खोमारपाडा गावाचे दसवार्षिक नियोजन करण्याकरिता पाचारण करण्यात आले. या कार्याचे पहिले आणि छोटे उद्देश खोमारपाड्याचे दसवार्षिक नियोजन करणे होते तर दूसरे आणि मुख्य उद्दिष्ट राज्यभरातील लोकांना हे लक्षात येणे की गरीबातले गरीब कुटुंब मनरेगाच्या मदतीने समृध्द (लखपती) होऊ शकतात.

या प्रकारे मोरे गुरुजी स्वत: शिकण्यासोबतच मनरेगाच्या प्रशिक्षण प्रक्रियेतूनसुध्दा शिकत आहेत. तर मनरेगा खोमारपाड्याच्या प्रगतीतून आणि पर्यायाने मोरे गुरुजींच्या नेतृत्वातून शिकत आहे.









**<u>परिशिष्ट – एक</u>**

भाजीपाला, फुले आणि इतर उत्पादनातून शेतकऱ्यांना झालेला फायदा :

| पिक | पिकाचा कालावधी (दिवस) | अंदाजे उत्पन्न प्रती एकर | भाव - प्रती टन | अंदाजे खर्च | मिळणारे पैसे | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|---|---|
| लाल कांदा | १३५ | ८ टन | १५,००० | २०,००० | १,२०,००० | **१,००,०००** |
| भात | १५० | १ टन | १३,००० + ५,००० पेंढा | १३,००० | १८,००० | ५,००० |
| टोमॅटो | ४५ | ७ टन | १५,००० | २५,००० | १,०५,००० | ८०,००० |
| मिरची | ५० | ५ टन | २५,००० | ३०,००० | १,२५,००० | ९५,००० |
| गवार | ४५ | ५ टन | २०,००० | २०,००० | १,००,००० | ८०,००० |
| वांगे | ६० | ७ टन | १०,००० | २०,००० | ७०,००० | ५०,००० |
| टरबूज | ९० | १५ टन | १०,००० | ३०,००० | १,५०,००० | **१,२०,०००** |
| पत्ताकोबी | ९० | ७ टन | २०,००० | ३५,००० | १,४०,००० | **१,०५,०००** |
| दुधी | ५० | १० टन | ७,००० | २०,००० | ७०,००० | ५०,००० |
| डांगर | ९० | १० टन | १०,००० | २०,००० | १,००,००० | ८०,००० |
| कारले | ५० | ८ टन | २०,००० | २०,००० | १,६०,००० | **१,४०,०००** |
| भेंडी | ४५ | ४ टन | २०,००० | १५,००० | ८०,००० | ६५,००० |
| शिराळा | ४५ | ५ टन | २०,००० | २०,००० | १,००,००० | ८०,००० |
| गिलके | ४५ | ४ टन | २०,००० | २०,००० | ८०,००० | ६०,००० |
| सूर्यफूल | ९० | ३०० कि.ग्रा. | ४०,००० | १५,००० | १,२०,००० | **१,०५,०००** |
| पांढरा कांदा | ९० | ५ टन | २५,००० | २०,००० | १,२५,००० | **१,०५,०००** |
| काकडी | ४५ | १० टन | १०,००० | २०,००० | १,००,००० | ८०,००० |
| मेथी | ३० | ६००० जुड्या | १० प्रती जुडी | १०,००० | ६०,००० | ५०,००० |
| पालक | ३० | ६००० जुड्या | १० प्रती जुडी | १०,००० | ६०,००० | ५०,००० |

| पिक | पिकाचा कालावधी (दिवस) | अंदाजे उत्पन्न प्रती एकर | भाव - प्रती टन | अंदाजे खर्च | मिळणारे पैसे | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|---|---|
| शेपू | ३० | ६००० जुड्या | १० प्रती जुडी | १०,००० | ६०,००० | ५०,००० |
| कोथांबीर | ३० | ६००० जुड्या | १० प्रती जुडी | १०,००० | ५०,००० | ४०,००० |
| मोगरा | २,५०० ते ३,००० झाडे | २५-३० किलो | १००० रु प्रति किलो | ५०,००० | २५,००० प्रति महिना | **२,५०,०००** वार्षिक नफा |

- (अंदाजे लागणारा खर्च- यामध्ये वाहतूक खर्च + यंत्रसामग्री खर्च + बियाणे खर्च + खतांसाठी लागणारा खर्च इत्यादी जोडलेले आहे.)
- हिरवा रंग - उत्पन्न 100000 च्या वर